# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०३/२०२४ (सोमवार) सकाळ**


---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— फिर्यादी नामे— पोहवा शैलेंद्र नागरे पो.स्टे. एमआयडीसी बोरी यांच्या रिपोर्ट वरुन पो. स्टे. एमआयडीसी बोरी येथे अप. क्र. ३६३/२० कलम ३०२, १७७, २०१ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील आरोपी नामे— दिनेश छेटीलाल पाल वय ३० वर्ष रा. चुरहर जि. सिंधी (मध्य प्रदेश) व मृतक नामे—सौ. सुषमा दिनेश पाल वय २८ वर्ष रा. चुरहर जि. सिंधी (मध्य प्रदेश) हे पती पत्नी असुन यातील आरोपी याने पोलीस ठाणे एमआयडीसी बोरी येथे येवुन तक्रार दिली की त्याचे पत्नी मृतक हिला हार्ट अटॅक आल्याने मरण पावली आहे. यावरून पो.स्टे. ला मर्ग क्र. ३७/२० कलम १७४ जाफौ दाखल करण्यात आला. मर्ग चौकशी दरम्यान आरोपीनेच घरगुती कारणावरून मृतक हिचे गळा दाबुन खुन केल्याचे निष्पन्न झालेवरून गुन्हा नोंद केला होता.

सदर प्रकरणाचे तपास तत्कालीन पोउपनि डी. आर. दराडे सा. यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ०५ कनकदंडे मॅडम कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक १८/०३/२०२४ रोजी मा. डी. जे. ०५ कनकदंडे मॅडम यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व २०००/—रू. दंड दंड न भरल्यास २ महीने साधा कारावास तसेच कलम १७७ भादंवी मध्ये ०३ महिने सश्रम कारावास व १०००/—रू. दंड दंड न भरल्यास १ महीने कारावास. कलम २०१ भादंवी मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड दंड न भरल्यास १ महीने कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी मोटघरे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सहायक फौजदार अनिल व्यवहारे पो.स्टे. एमआयडीसी बोरी यांनी मदत केली आहे.

# तलवारीने केक कापुन वाढदिवस साजरा करणाऱ्या युवकावर गुन्हा दाखल

दिनांक १७/०३/२०२४ रोजी गोपनीय माहीती मिळाली की, राहील मोहनिकर नावाच्या युवकाने त्याचा वाढदिवाचा केक तलवारीने कापुन साजरा केला आहे. अश्या विश्वसनीय माहीती वरून आरोपी नामे राहील गजानन मोहनिकर वय १९ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड याच्या राहत्या घरी जाउन त्याच्या घराची घरझडती घेतली असता त्याचे घरातुन एक प्राणघातक शस्त्र तलवार जप्त करण्यात आली. जप्त तलवारीसह व नमुद आरोपीला ताब्यात घेवून पोलीस नाईक पंकज बट्टे यांचे लेखी रीपोर्ट वरून आरोपी विरूध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा पुढील तपास पो.हवा. राधेश्याम कांबळे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजा पवार उमरेड विभाग उमरेड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद घोंगे, पोलीस हवालदार प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, पोलीस नाईक पंकज बट्टे, पोलीस अमंलदार गोवर्धन शहारे, उमेश बान्ते, म.पो.शि. सुषमा भोयर पोस्टे उमरेड (ना.ग्रा.) यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर